आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१७ ऑक्टोबर २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- इंटरनेटचा वापर करणं, हा लहान मुलांसह सर्व व्यक्तींचा मूलभूत अधिकार असल्याचं मत सर्वोच्च न्यायालयाकडून व्यक्त

- यंदाच्या रब्बी हंगामात राज्य सरकार शेतकऱ्यांना ज्वारी बियाण्यासाठी ५० टक्के अनुदान देणार

- बांग्लादेशात रिसॉर्टला लागलेल्या आगीत १० जणांचा मृत्यू

आणि

- प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक देवा यांचं आज चेन्नईमध्ये निधन

**<><><><>**

इंटरनेटचा वापर करणं, हा लहान मुलांसह, सर्व व्यक्तींचा मूलभूत अधिकार आहे, असं सर्वोच्च न्यायालयानं जाहीर केलं आहे. या अधिकारापासून लहान मुलांना पूर्णपणे वंचित ठेवणं योग्य ठरणार नाही, असंही न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या पीठानं सांगितलं. लहान मुलांचं शोषण किंवा तत्सम आशय समाजमाध्यमं आणि इतर ऑनलाइन मंचांवरून काढून टाकण्यासंदर्भात सूचना देताना पीठानं हे निरीक्षण नोंदवलं. लहान मुलांचं लैंगिक स्वरूपात चित्रण करणारा आशय रोखण्यात समाजमाध्यम कंपन्यांकडून होत असलेल्या त्रुटींची सर्वोच्च न्यायालयानं गंभीर दखल घेतली आहे. ज्यामुळे लहान मुलांना इजा पोहोचेल, असा कोणताही आशय सशुल्क किंवा वर्गणी घेऊन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही मंचांवर उपलब्ध होणार नाही, याची सर्व संबंधितांनी काळजी घ्यावी, अशा सूचना न्यायालयानं दिल्या.

**<><><><>**

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्री भूपेंदर यादव यांनी आज प्रदूषण नियंत्रण क्षेत्रातले नवउद्योजक आणि नवोन्मेष कंपन्यांबरोबर नवी दिल्लीत चर्चा केली.  अशा उपक्रमांमुळे धोरणांची अंमलबजावणी आणि प्रशासनातली पारदर्शकता वाढवण्यात सुसूत्रता निर्माण होते असं ते म्हणाले.

<><><><>

कर्करोगाचं अचूक निदान, आजाराचा टप्पा निश्चित करणं आणि उपचारांचा परिणाम तपासण्यासाठी महत्त्वाची असलेली PET-CT स्कॅन ही महागडी तपासणी आता 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत' उपलब्ध होणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागानं यासंदर्भातला शासन निर्णय जारी केला असून ६३ कर्करोग उपचारांच्या पॅकेजमध्ये PET-CT तपासणीचा 'अतिरिक्त निदान प्रक्रिया' म्हणून समावेश केला आहे. तसंच निवडक १३ प्रकारच्या कर्करोगांसाठी पीईटी-सीटीचा स्वतंत्र अथवा नियमित प्राथमिक निदान प्रक्रिया म्हणून समावेश करण्यात आला आहे.

<><><><>

FSSAI अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं सहा महिन्यांच्या बालकांसाठीच्या खाद्यपदार्थांमध्ये फ्रुकटोज आणि सुक्रोज मिसळण्यावर बंदी घालण्याचा प्रस्ताव मांडला आहे. नवजात बालकांचा सुरुवातीच्या चोवीस महिन्यांपर्यंत अतिरिक्त साखरेपासून बचाव व्हावा यासाठी हा सुधारित मसुदा तयार करण्यात आल्याचं प्राधिकरणानं नमूद केलं आहे.

<><><><>

यंदाच्या रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना प्रमाणित ज्वारी बियाण्यांचं ५० टक्के अनुदानावर वितरण केलं जाणार असल्याची घोषणा राज्याच्या कृषी विभागानं केली जाणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण उप अभियानांतर्गतच्या पौष्टिक तृणधान्य योजनेच्या माध्यमातून हा लाभ दिला जाणार आहे. यासोबतच पीक प्रात्यक्षिकांसाठी शेतकऱ्यांच्या गटांना बियाणांकरता १०० टक्के अनुदान दिलं जाणार असल्याची घोषणाही कृषी विभागानं केली आहे. यासाठी पात्र शेतकरी आणि शेतकरी गटांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत असं आवाहनही कृषी विभागानं केलं आहे.

<><><><>

राज्य सरकारनं शेतकऱ्यांना जाहीर केलेली ५ हजाराची मदत तुटपुंजी आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना २० हजार आणि शेत मजुरांना १० हजार रुपये मदत द्यावी

अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. मराठवाड्यातल्या दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणी दरम्यान ते बोलत होते.

<><><><>

केंद्र सरकारनं साखर आणि उसापासून तयार होणाऱ्या इथेनॉलची खरेदी बंद करण्याचे निर्देश पेट्रोलियम कंपन्यांना दिले आहेत. यंदा कमी पावसामुळे उसाचं पीक अपेक्षेपेक्षा कमी झालं आहे. त्यामुळं साखरेच्या किमती नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशानं हा निर्णय घेतल्याचं सरकारनं म्हटलं आहे. येत्या १ नोव्हेंबरपासून हा निर्णय लागू असेल.

<><><><>

यंदाच्या जुलै महिन्यात नवी दिल्लीत जंतरमंतर आणि इतर ठिकाणी झालेल्या हिंसाचाराच्या तक्रारी दाखल करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या उच्चाधिकार चौकशी समितीनं एक वेबसाइट सुरू केली आहे. या हिंसाचाराचा फटका बसलेले नागरिक, आणि पोलीसही http://hpec.nic.in या पोर्टलवर आपलं म्हणणं नोंदवू शकतात.

<><><><>

दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजीत दिपके याची आज जामीनावर सुटका झाली. शांतता राखण्याचं हमीपत्र लिहून दिल्यानंतर अभिजीत दिपके याची जामीनावर सुटका केल्याचं पोलिसांनी सांगितलं. लहरा दो तिरंगा या आंदोलनात सहभागी होण्यासाठी काल घरातून निघाल्यालंतर दिल्ली पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं होतं. त्यानंतर १० ऑक्टोबर रोजी दिलेल्या शांतता राखण्याच्या हमीपत्राचं उल्लंघन केल्याच्या आरोपावरून त्याला अटक केली होती.

<><><><>

दिल्ली-मुंबई महामार्गावर राजस्थानमध्ये आज एक वाहन १५ फूट खोल नाल्यात कोसळून ८ जण ठार झाले, तर १५ जण जखमी झाले. मृत्यूमुखी पडलेले सर्वजण मध्य प्रदेशातल्या बेतुल जिल्ह्याचे रहिवासी होते. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी मृतांच्या कुटुबांना प्रत्येकी ४ लाख रुपये मदत जाहीर केली आहे.

<><><><>

बांग्लादेशच्या कॉक्स बाजार जिल्ह्यात एका समुद्रकाठच्या रिझॉर्ट ला आज सकाळी आग लागून किमान १० जणांचा मृत्यू झाला तर इतर अनेक जण जखमी झाले आहेत. मरण

पावलेल्या १० जणांपैकी ६ जण एकाच कुटुंबातले होते. संपूर्ण लाकडी बांधकाम असलेल्या या रिझॉर्टमधल्या या आगीची सुरुवात स्वयंपाकघरातून झाल्याचा अंदाज असला तरी अद्याप नक्की कारण कळलं नसल्याचं अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

इराण समर्थित हुथींच्या ताब्यात असलेल्या येमेनच्या धमार प्रांतात झालेल्या हवाई हल्ल्यात तीन मुलांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले.

येमेनमध्ये इराण समर्थित हूतींच्या वाढत्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आपण सौदी अरेबियाच्या रक्षणासाठी तयार असल्याचं इजिप्तचे अध्यक्ष अब्दुल फताह अल सीसी यांनी म्हटलं आहे.

इस्रायलनं आज गाझामध्ये पुन्हा हल्ले केले. या हल्ल्यात एका अल्पवयीन लहान मुलासह चार जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाल्याची माहिती तिथल्या रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

दुसरीकडे सौदी अरेबियाजवळील पर्शियन आखातातून जात असलेल्या दोन व्यावसायिक जहाजांवर हल्ला झाल्याचा दावा युकेच्या सागरी व्यापार संघटनेनं केला आहे. या हल्ल्यानंतर दोन्ही जहाजांवरचे कर्मचारी सुरक्षित असल्याची माहितीही संघटनेनं दिली आहे.

<><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, 'सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट २०२६' अंतर्गत लादलेलं शुल्क आणि अनेक निर्बंध निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे रशियाकडून तेल आणि नैसर्गिक वायू इंधन खरेदी करणाऱ्या, भारत आणि चीनला मोठा दिलासा मिळाला आहे. अमेरिकेच्या राष्ट्रीय हितासाठी हा निर्णय घेतल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. या तरतुदी लागू करण्याची मुदत उद्या संपणार होती, त्याआधी एक दिवस ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला. या कायद्यातल्या परदेशी व्यक्तींशी संबंधित अनेक निर्बंधांच्या तरतुदीही निलंबित करण्यात आल्या आहेत. आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष किंवा परराष्ट्र मंत्री, संबंधित अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून या पुढची कारवाई योग्य असल्याचा निर्वाळा देत नाही तोपर्यंत या तरतुदी निलंबित राहणार आहेत.

<><><><>

प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक देवा यांचं आज चेन्नई इथं एका खासगी रुग्णालयात निधन झालं. ते ७५ वर्षांचे होते. गाना या विशिष्ट संगीतशैलीसाठी देवा ओळखले जात. जवळपास ४ दशकांच्या कारकीर्दीत त्यांनी ४००पेक्षा जास्त चित्रपटांना संगीत दिलं आहे.

**<><><><>**

अमेरिकेत लास वेगास इथं सुरु असलेलेल्या २३ वर्षांखालच्या जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताच्या अमृता पुजारी हिनं महिलांच्या ७२ किलो वजनी गटात रौप्य पदक पटकावलं. सुवर्णपदकासाठी आज झालेल्या अंतिम अमृता हिला युक्रेनच्या इरिना हीनं ० - ६ असं पराभूत केलं. त्यामुळे तिला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

त्याआधी स्पर्धेत काल महिलांच्या ५९ किलो वजनी गटात भारताच्या कोमल हीनं कांस्यपदक जिंकलं.

**<><><><>**

पॅराग्वेमध्ये झालेल्या जागतिक स्केटिंग स्पर्धेच्या वन लॅप रोड रेस प्रकारात पुरुषांच्या कनिष्ठ गटात भारताच्या अनिरुद्धन विनोदनं सुवर्णपदक पटकावलं. त्यानं नियोजित अंतर केवळ ३० पूर्णांक ३९४ सहस्त्रांश सेकंदात पार केलं.

**//<><><><>//**